# वार्षीक अहवाल
# (2019-2020)

## 1) विद्यादीप (सोलर लँप) वाटप :-

शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालूक्यातील दुर्गम आदिवासी भागातील विज नसणाऱ्या कुटूंबातील विद्यार्थ्यांना विद्यादीप (सोलर लँप) वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम मौजा येरंडी ता.धानोरा येथील गोटूलमध्ये घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्टचे कार्याध्यक्ष मा. पी.आर. नरवाडे, मा. बाजीराव कुमोटी पोलीस पाटील येरंडी, मा. जूमनाके प्राथमिक शिक्षक येरंडी, मा. कोरेटी भुमीया इलाखा प्रमूख नवरगांव, मा. अकिल शेख सचिव अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, मा. सौ. वैशाली मशाखेत्री सचिव मानव बहुउद्देशिय संस्था धानोरा व कुमोद मशाखेत्री उपस्थित होते.

सदर कार्यक्रम आयोजित करण्याचा मुख्य उद्देश- ज्या कुटूंबाकडे विज नाही त्यामुळे त्यांचे पाल्यांना अभ्यास करण्याकरीता अडचण निर्माण होते त्यामुळे कुटूंबाला विद्यादीप वाटप करुन विद्यार्थ्यांसाठी विज उपलब्ध करुन देण्यात आली. याकरीता परिसरातील शिवाटोला, नवरगांव, भुरानटोला, येरंडी येथील विज नसलेले 36 कुटूंबांना विद्यादीप देण्यात आले. याचा फायदा 36 कुटूंबातील 150 ते 200 लोकांना झाला.

सदर कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मा. भास्कर गावळे यांनी केले.





## 2) अंधश्रध्दा निर्मुलन जनजागृती कार्यक्रम :-

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने युवक कल्याण योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील मौजा भुरानटोला ग्रामपंचायत नवरगांव ता. धानोरा जि. गडचिरोली येथे दिनांक 19.06.2019 पासून 23.06.2019 पर्यंत अगरबत्ती प्रकल्पाच्या पटांगणात समाजसेवा शिबीर अंतर्गत अंधश्रध्दा निर्मुलन जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. नामदेवजी नरोटे ग्रामसभा अध्यक्ष भुरानटोला, प्रमुख पाहुणे मा. काशिनाथजी नरोटे पोलीस पाटील भुरानटोला, मा. बाबुरावजी नैताम, मा. देवाजी हलामी प्रतिष्ठीत नागरीक भुरानटोला मा. अकिल शेख सचिव, अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, मा. भास्कर गावळे कोतवाल यांच्या उपस्थितीत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. जनजागृती कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. उध्दवजी डांगे, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी गडचिरोली, मा. विलासजी निंबोरकर कार्याध्यक्ष अंनिस गडचिरोली, मा. कोठारे अंनिस सदस्य उपस्थित होते.

मा. उध्दव डांगे सर यांनी अंधश्रध्दा म्हणजे काय ? अंधश्रध्देमुळे होणारे नुकसान, बुवाबाजी आणि वैदु यांना विशेषत: महिला बळी पडतात त्यामुळे प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून त्यांच्या मनातील अंधश्रध्दा दुर करण्याचा प्रयत्न केला. मा. विलास निंबोरकर सर यांनी गावातील आदिवासी लोकांना भुतबाधा यांच्या मानसिकतेत आदिवासी समाज भरकटलेला आहे त्यामुळे आदिवासी बांधवांनी अंधश्रध्देला बळी न पडता वैज्ञानिक युगात वैद्यकिय उपचार घेऊन रोग बरा करावा. त्याचप्रमाणे निंबोरकर सर यांनी सापांचे विविध प्रकार, विषारी आणि बिनविषारी साप यापासून घ्यावयाची काळजी तसेच साप चावल्यावर वैदुकडे न जाता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन अभिषेक मुत्तेलवार कार्यकर्ता अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली तसेच आभार प्रदर्शन मयुर गड्डमवार यांनी केले. अंधश्रध्दा निर्मुलन जनजागृती कार्यक्रमाचा लाभ गावातील 250 नागरिकांनी घेतला.





## 3) मतदार जनजागृती व प्रचार, प्रसिध्दी कार्यक्रम :-

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गडचिरोली यांचे माध्यमातून तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने स्वीप कार्यक्रमाअंतर्गत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2019 निमीत्य गडचिरोली जिल्ह्यातील 68-गडचिरोली विधानसभा क्षेत्राअंतर्गत गडचिरोली, धानोरा, चामोर्शी आणि मुलचेरा तालुक्यातील 25 गावांमध्ये तसेच आठवडी बाजारामध्ये मतदार जनजागृती व प्रचार, प्रसिध्दी कार्यक्रम कलापथकाच्या माध्यमातून सादर करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचा मुख्य उद्देश 11 एप्रिल 2019 ला होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2019 मध्ये देशातील प्रत्येक नागरीकाला संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार मतदाराने मतदान करुन पार पाडावा तसेच यावर्षीपासून निवडणूक आयोगाने दिव्यांग, अंध व गरोदर माता यांना मतदान करण्यासाठी दिलेल्या सुविधा याची जाणीव करुन देऊन 100 टक्के मतदान होण्यासाठी जागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रम मा. शेखर सिंग जिल्हाधिकारी गडचिरोली, मा. मोहीत गर्ग नोडल अधिकारी (स्विप मोहिम) गडचिरोली, मा. पडघन सहा. नोडल अधिकारी (स्विप), मा. डॉ. प्रकाश पवार संचालक आत्मा गडचिरोली, मा. चडगुलवार नायब तहसिलदार (निवडणूक) गडचिरोली, तसेच सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार, बीएलओ यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे सचिव अकिल शेख आणि गणपत मोहुर्ले कलापथक प्रमुख यांच्या सहकार्याने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.

तसेच माहे ऑक्टोंबर 2019 मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 घेण्यात आली त्यामध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या माध्यमातून आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, अहेरी, सिरोंचा, एटापल्ली तालुक्यातील 20 गावांमध्ये मतदार जनजागृती प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम कलापथकाच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचा लाभ धानोरा, चामोर्शी, मुलचेरा, भामरागड, अहेरी, एटापल्ली, आणि सिरोंचा येथील अनेक नवमतदार, दिव्यांग, अंध, गरोदर माता यांना झाला.





**4) राष्ट्रीय तंबाखु विरोधी दिवस जनजागृती :-**

जिल्हा शल्य चिकित्सक गडचिरोली यांचे अंतर्गत जिल्हा तंबाखु विरोधी कृती समिती आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने दिनांक 31 मे 2019 ला जिल्हा रुग्णालय गडचिरोली येथे राष्ट्रीय तंबाखु विरोधी दिवस निमित्य कलापथकाव्दारे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.डॉ. अनिल रुडे जिल्हा शल्यचिकित्सक, मा. नरेंद्र मेश्राम, दंत चिकित्सक तथा जिल्हा तंबाखु विरोधी कृती समिती प्रमुख यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता संस्थेचे सचिव अकिल शेख आणि गणपत मोहुर्ले कलापथक प्रमुख यांच्या संचाने जनजागृती कार्यक्रम सादर केला. त्याचा लाभ रुग्णालयात असणाऱ्या अनेक रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना झाला.

**5) मोफत स्कुल किट वाटप :-**

सेवा सहयोग फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने चामोर्शी तालुक्यातील ग्रामपंचायत गिलगाव येथे दिनांक 23.06.2019 ला कुनघाडा परिसरातील वर्ग 1 ते 7 मध्ये शिकणाऱ्या एकल महिला (विधवा, घटस्फोटीत, परितक्ता) यांच्या मुलांना मोफत स्कुल किट वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. किरण शिडाम सरपंच ग्रामपंचायत गिलगाव, मा. अकिल शेख सचिव अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, सौ. सागर मेश्राम सामाजिक कार्यकर्ती नवरगाव यांचे हस्ते स्कुल किट वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला नवरगाव, गिलगांव, चित्तेकन्हार, भेंडीकन्हार, मालेरमाल, कुथेगांव येथील 40 एकल महिलांच्या मुलांना तसेच धानोरा तालुक्यातील हेटी, तुकुम, कन्हारटोला, नवरगाव, भुरानटोला, राजोली येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या एकल महिलांच्या 20 मुलांना स्कुल किट देण्यात आली.

त्याकरीता संस्थेचे कार्यकर्ते अभिषेक मुत्तेलवार, मयुर गड्डमवार, राजकुमार अतकरी यांनी परिश्रम घेतले.





## 6) 33 कोटी वृक्ष लागवड जनजागृती :-

उपवनसंरक्षक वडसा वनविभाग वडसा यांच्या सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 01.07.2019 ते 30.09.2019 पर्यंत सुरु असलेल्या 33 कोटी वृक्ष लागवड अभियान कार्यक्रमाअंतर्गत वडसा वनविभागाअंतर्गत येणाऱ्या पोर्ला, देलनवाडी, कुरखेडा, मालेवाडा वनपरिक्षेत्रातील 8 गावांमध्ये दिनांक 03.09.2019 ते 06.09.2019 पर्यंत 33 कोटी वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धनाबाबत कलापथकाव्दारे प्रसार, प्रचार जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आले.

सदर कार्यक्रम मा. विवरेकर उपवनसंरक्षक वडसा वनविभाग वडसा यांच्या मार्गदर्शनात तसेच मा. चांगोले, मा. धोंडणे, मा. सोनटक्के, मा. भोसले वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या देखरेखीत तसेच वनपाल, वनरक्षक व इतर कर्मचारी यांच्या सहकार्याने संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या नियोजनानुसार गणपत मोहुर्ले कलापथक यांच्या संचाने जनजागृतीचे कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रमाचा लाभ 8 गावातील अनेक लोकांना झाला.





## 7) महिलांसाठी डिजीटल साक्षरता कार्यक्रम :-

महाराष्ट्र राज्य, महिला आयोग मुंबई यांच्या सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 30.11.2019 ला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात महिलांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा. अनुसया गुप्ता सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग (विदर्भ विभाग) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. इंदुराणी जाखड उपविभागीय अधिकारी गडचिरोली तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली, मा. प्रंचित सावकार पोरेड्डीवार अध्यक्ष जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गडचिरोली, मा. योगीताताई पिपरे नगराध्यक्ष नगर परिषद गडचिरोली, मा. सचिन अडसुळ जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली, मा. अतुल भडांगे महिला व बाल विकास अधिकारी गडचिरोली, मा. राजेंद्र चौधरी जिल्हा व्यवस्थापक नाबार्ड गडचिरोली, मा. सुधा सेता सामाजिक कार्यकर्ता तसेच मा. उमेश पाटील मार्गदर्शक नाशिक यांचे उपस्थितीत कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळेला गडचिरोली शहरातील महिला बचत गटाच्या सदस्या, महाविद्यालयीन विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, माविमच्या संयोजीका तसेच गावातील 200 महिला कार्यशाळेला उपस्थित होत्या. कार्यशाळेचे संचालन वैशाली रायपुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव अकिल शेख यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सदस्य प्रकाश मोहितकर, जगदिश ढोलणे, अभिषेक मुत्तेलवार, मयुर गड्डमवार यांनी परिश्रम घेतले.





**8) बाल कामगार विरोधी रॅली आणि बाल दुर्व्यापार मुक्त भारत करीता जनसंवाद कार्यक्रम :-**

कैलास सत्यार्थी चिल्ड्रेन फाऊंडेशन, नवि दिल्ली आणि बचपन बचाव आंदोलन तथा सरस्वती सेवाभावी संस्था भटवडगांव जिल्हा बिड यांचे मार्गदर्शनात आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 14.11.2019 ला पंडित जवाहरलाल नेहरु यांचे जयंतीनिमित्य गडचिरोली शहरातील मुख्य रस्त्यावरुन गडचिरोली शहरातील अनेक शाळेतील मुलांच्या सहकार्याने बालकामगार विरोधी रॅलीचे आयोजन चाईल्ड लाईन गडचिरोली यांच्या माध्यमातून करण्यात आले.

दिनांक 07.12.2019 ला सकाळी 11.00 वाजता कै. जीवनराव पाटील मुनघाटे महाविद्यालय धानोरा यांच्या सभागृहात बाल-दुर्व्यापार मुक्त भारत करीता जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

धानोरा तालुका हा गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम संवेदनशिल तालुका म्हणून ओळखल्या जातो. धानोरा तालुक्याची सिमा आंतरराज्यीय सिमेला जोडून आहे त्यामुळे या ठिकाणी बालकांचा दुर्व्यापार व मानवी तस्करी मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सौ. वर्षाताई चिमुरकर माजी नगराध्यक्ष धानोरा, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. के.पी. किरमिरे प्राचार्य धानोरा, प्रमुख पाहुणे मा. ॲड. गुंडावार, मा. अंजली राजपुत सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन धानोरा, मा. सिताराम बढोले पत्रकार, मा. सुरणकर मुख्याध्यापक मुरुमगांव, मा. शिवराम चिमुरकर ज्येष्ठ नागरीक संघटना, अकिल शेख सचिव, अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, मा. दिनेश चंदेल व्यापारी संघटना धानोरा, मा. मोहुर्ले अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय धानोरा, मा. यामिनी चौधरी चाईल्ड लाईन गडचिरोली उपस्थित होते.

जनसंवाद कार्यक्रमाचे संचालन अभिषेक मुत्तेलवार आणि आभार प्रदर्शन भास्कर गावळे यांनी केले. सदर जनसंवाद कार्यक्रमाला अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ज्येष्ठ नागरीक, महिला बचत गट सदस्य आणि प्रियदर्शनी महाविद्यालय आणि के. जीवन पाटील मुनघाटे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनीनी उपस्थिती दर्शविली.

दिनांक 10 जानेवारी 2020 ला जागतिक सुरक्षित बालक दिवस निमित्य प्रियदर्शनी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय धानोरा येथे बाल कामगार मुक्त बालक या विषयी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.





**<u>9) उषा शिलाई स्कुल शिक्षक प्रशिक्षण :-</u>**

अफार्म पुणे तथा उषा इंटरनॅशनल दिल्ली आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 15.12.2019 ते 21.12.2019 पर्यंत वडधा परिसरातील 10 गरजू, गरिब, शिलाई मशिन शिकलेल्या परंतू शिलाई मशिन नसलेल्या महिलांना शिलाई मशिन शिक्षक प्रशिक्षणाचे आयोजन सरस्वती वाचनालय बोडधा चक ता. आरमोरी जि. गडचिरोली येथे करण्यात आले.

सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन मा. डॉ. दुर्वेश भोयर, संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गडचिरोली यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाला मा. सालोरकर सर बोडधा, मा. प्रा. नरुले, मा. अकिल शेख सचिव अभिनव

बहुउद्देशिय कला मंच गडचिरोली यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रशिक्षणानंतर प्रशिक्षित झालेल्या महिला शिलाई शिक्षिका म्हणून गावात, परिसरात स्वतःचे कपडे तसेच गावातील इतरांचे कपडे शिवण्याचे काम करतील आणि गावातील इच्छुक असलेल्या महिला आणि युवतींना शिवणक्लास शिकविण्याचे कार्य करतील. प्रशिक्षणाचा समारोप मा. सहाकाटे मॅडम सदस्य जिल्हा परिषद गडचिरोली, मा. वर्षा मत्ते प्रशिक्षिका उषा इंटननॅशनल दिल्ली, मा. जगदिश ढोलणे सदस्य अभिनव बहुउद्देशिय कला मंच गडचिरोली यांच्या उपस्थितीत पार पडला.

समारोपानंतर प्रशिक्षणात सहभागी झालेल्या शिलाई प्रशिक्षक महिलांना उषा कंपणीच्या माध्यमातून स्वयंरोजगारासाठी शिलाई मशिन देण्यात आली.





**10) कुशन मेकींग प्रशिक्षण :-**

युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालय स्वायतशासीत संस्था (भारत सरकार), नेहरु युवा केंद्र संघटन गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्‌देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 01.01.2020 ते 31.03.2020 पर्यंत मुलभूत व्यवसाय शिक्षण अंतर्गत कुशन मेकींग प्रशिक्षण चामोर्शी तालुक्यातील ग्रामपंचायत येडानुर येथील समाज मंदिरात महिला व युवतींसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षणाचे उद्‌घाटन मा. सौ. निर्मला कनपुरवार, सदस्य ग्रामपंचायत येडानुर, मा. सौ. विजया कोवाचे अध्यक्ष ग्रामसंघ येडानुर, मा. अकिल शेख सचिव अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली, मा. सौ. पुष्पा जाधव प्रशिक्षिका कुशन मेकिंग येडानुर उपस्थित होते.

सदर प्रशिक्षण मा. अमित पुंडे, जिल्हा युवा समन्वयक नेहरु युवा केंद्र गडचिरोली यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला. सदर प्रशिक्षणाला येडानुर ग्रामपंचायत अंतर्गत येडानुर, रावनपल्ली, पांढरीभट्टाड या गावातील महिला व युवती उपस्थित राहून त्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.





## 11) सेंद्रिय परसबाग लागवड प्रशिक्षण :-

द सहाय्यक ट्रस्ट मुंबई व अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचे माध्यमातून दिनांक 30.01.2020 ला शासकिय माध्यमिक आश्रम शाळा कारवाफा ता. धानोरा आणि दिनांक 31.01.2020 ला अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा चांदाळा ता.गडचिरोली येथे आश्रमशाळेतील अधिक्षकांसाठी सेंद्रिय परसबाग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर प्रशिक्षणाचे प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून मा. आतीष गायकवाड व प्रशांत शिंदे यांनी अधिक्षकाना परसबाग लागवडीचे फायदे, उद्देश याची माहिती प्रेजेन्टेशनच्या माध्यमातून दिली. सदर प्रशिक्षण मा. डॉ. इंदुराणी जाखड यांच्या मार्गदर्शनात तसेच मा. सोमनकर सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या नियोजनानुसार संस्थेचे सचिव अकिल शेख, जगदिश ढोलणे सदस्य यांनी प्रशिक्षणासाठी मदत केली. आणि प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला परसबाग किट वाटप करण्यात आले.





## 12) इंग्लीश ई टिच उपक्रम :-

बॉम्बे कॉम्युनिटी पब्लीक ट्रस्ट मुंबई आणि अपेक्षा होमिओ सोसायटी गुरुकुंज मोझरी यांच्या मार्गदर्शनात अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने धानोरा तालुक्यातील धानोरा, दुधमाळा, मोहली, रांगी, मेंढाटोला केंद्रातील 30 जिल्हा परिषद शाळांमध्ये वर्ग 1 ते 5 वी च्या विद्यार्थ्यांकरीता इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम ॲनिमेटेड पध्दतीने पेन्ड्राईव्हमध्ये डाटा देऊन इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांकरीता मोफत देण्यात येत आहे. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयाची भिती नाहीशी झालेली असून विद्यार्थ्यांचे शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढलेले आहे. सदर उपक्रम डॉ. मधुकर गुंबडे, डॉ. सतीश गोगुलवार, संजीवनी ठाकरे, मारोती चौरे यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या नियोजनानुसार स्कुल फॅसिलीटेटर अभिषेक मुत्तेलवार व विलास मडावी यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.

सदर उपक्रमामुळे 30 जिल्हा परिषद शाळेतील 1642 विद्यार्थ्यांना मागील 2 वर्षापासून लाभ मिळत आहे.





## 13) माझी कन्या भाग्यश्री योजनेची जनजागृती :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी, मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा व अहेरी तालुक्यातील 30 गावामध्ये कलापथकाच्या माध्यमातून माझी कन्या भाग्यश्री योजनेची जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आले. सदर कार्यक्रमात मुलींचा जन्म साजरा करण्यासाठी प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत आई / मुलगी यांचे नावे खाते उघडले जाते तसेच आयुर्विमा महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र शासनाच्या आम आदमी योजनेअंतर्गत मुलींच्या नावे जमा केलेल्या रक्कमेतून मुलीच्या पालकाचा विमा उतरविला जातो. बेटी पढाओ, बेटी बचाव योजना, मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींच्या

शिक्षणाबाबत प्रोत्साहन देणे तसेच आरोग्याचा दर्जा वाढविणे याबाबत मा. लामतुरे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जि.प.गडचिरोली, मा. मेश्राम विस्तार अधिकारी (बा.क.) जि.प.गडचिरोली, मा. अकिल शेख सचिव अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या मार्गदर्शनात गणपत मोहुर्ले कलापथक प्रमुख यांच्या संचाने कलापथकाच्या माध्यमातून जनजागृतीपर कार्यक्रम सादर केले.





**<u>14) मुद्रा बँक योजना 2019-2020 बाबत जनजागृती :-</u>**

जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, गडचिरोली तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी, वडसा, कुरखेडा, कोरची तालुक्यातील 12 गावांमध्ये मुद्रा बँक योजना 2019-2020 अंतर्गत विविध शासकिय योजनांची प्रचार व प्रसिध्दीसाठी गावागावात कलापथकाव्दारे जनजागृती कार्यक्रम सादर करण्यात आले.

त्यामध्ये मुद्रा बँक योजना 2019-20 बाबत माहिती, शासनाच्या विविध योजनांची माहिती कलेच्या व संगीताच्या माध्यमातून सादर करण्यात आली. सदर कार्यक्रम मा. सचिन अडसुळ जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली, संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या मार्गदर्शनात गणपत मोहुर्ले कलापथक प्रमुख यांच्या संचाने कलापथकाव्दारे सादरीकरण केले.





Secretary
Abhinav Bahuddeshiya Kala Manch
Gadchiroli